बीड । महाराष्ट्र
मंगळवार दि.२४/२/२०२६
वर्ष ५ वे । अंक ३२४
पान १ । पाने ४
किंमत ३ रूपये

महाराष्ट्राचा बुलंद आवाज । दैनिक

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955
E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com

RNI/MAHMAR/2021/80074 Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 https://marathwadapatra.com https://epaper.marathwadapatra.com










## ओबीसी आरक्षणाचा निर्णय झाल्याशिवाय निवडणूक नका-सर्वोच्च न्यायालय

# जि.प.,पं.सं.निवडणुका पुन्हा लांबणीवर

**दिल्ली । वृत्तसेवा**

**राज्यातील जिल्हापरिषद आणि पंचायत समित्यांच्या प्रलंबित असलेल्या निवडणुका आता आणखी पुढे ढकलल्या जाणार आहेत. राज्यातील ओबीसी आरक्षणासाठीच्या बांठिया आयोगाच्या अहवालावर अंतिम निर्णय होईपर्यंत जिल्हापरिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुका घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने परवानगी नाकारली आहे. त्यामुळे आता दिवाळीपूर्वी या निवडणुका होणार नसल्याचे संकेत मिळत आहेत.**



राज्य निवडणूक आयोगानं आरक्षण निश्चिती करताना ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली गेली होती. काही ठिकाणी निवडणुका देखील पार पडल्या. २२ जिल्हा परिषद आणि या जिल्ह्यांमधील पंचायत समितीत आरक्षणाची ५० टक्के मर्यादा ओलांडली गेली होती. त्यामुळं या ठिकाणच्या निवडणुका घेण्यास स्थगिती देण्यात आली होती. राज्य निवडणूक आयोगानं १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुका पार पडलेल्या आहेत. उर्वरित २२ जिल्हा परिषदांच्या आणि उरलेल्या पंचायत समित्यांच्या निवडणुका अनिश्चित काळासाठी प्रलंबित राहण्याची शक्यता आहे. राज्यातील ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलांडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर सर्वोच्च न्यायालयानं मनाई कायम ठेवली आहे. राज्य सरकारच्यावतीनं तुषार मेहता यांनी अंतिम आदेशाच्या अधीन राहून निवडणूक घेण्यास परवानगी देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली होती. मात्र, सुप्रीम कोर्टानं ▶▶पान २ वर

## आवकाळी पावसाचा तडाखा

# रामपुरीत ज्वारीचे पिके 'भुईसपाट'



**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यात आज दुपारी सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास आवकाळी पावसासह जोरदार वादळी वाऱ्याने हजेरी लावली. या अचानक आलेल्या नैसर्गिक संकटामुळे मौजे रामपुरी येथील शिवारात मोठ्या प्रमाणावर ज्वारीची पिके भुईसपाट झाली असून शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. रामपुरी येथील लिंबाजी रामभाऊ मस्के यांच्या शेतात प्रतिनिधींनी प्रत्यक्ष पाहणी केली असता, भरघोस उभे असलेले ज्वारीचे पीक वादळाच्या तडाख्याने जमिनीवर कोसळलेले दिसून आले. काही ठिकाणी संपूर्ण शेती आडवी झाल्याने उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. हातातोंडाशी आलेला घास हिरावल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. रामपुरी हे गाव गोदावरी नदीकाठी वसलेले आहे. यापूर्वी गोदावरीच्या पुरामुळे नदीकाठच्या अनेक शेतजमिनी खरडून गेल्या होत्या. मात्र त्या वेळीही महसूल प्रशासनाकडून योग्य पंचनामे करण्यात आले नाहीत किंवा नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना अद्याप अनुदान मिळालेले नाही, अशी तीव्र नाराजी शेतकऱ्यांतून व्यक्त होत आहे. आता पुन्हा एकदा आवकाळी पावसाने वादळाच्या रूपाने ▶▶पान २ वर

# परभणीच्या पालक सचिव म्हणून तुकाराम मुंढेंची नियुक्ती



**मुंबई । वृत्तसेवा**

राज्यातील प्रशासनात मोठा फेरबदल करण्यात आलाय. मुख्य सचिव राजेश अगरवाल यांच्यासह आणखी ५ आएएस अधिकाऱ्यांचीही वेगवेगळ्या जिल्ह्यांचे पालक सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव असलेल्या तुकाराम मुंढे यांची परभणीच्या पालक सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ▶▶पान २ वर

### पालक सचिव का नियुक्त केले जातात?

जिल्हा स्तरावरील शासकीय कार्यालयांच्या शासन स्तरावरील (मंत्रालय स्तरावरील) प्रलंबित बाबी तातडीने सोडवण्यासाठी तसेच शासनाचे धोरणात्मक निर्णय लवकरात लवकर घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यासाठी पालक सचिव यांची नियुक्ती करण्यात येत असते. शासनाचे धोरणात्मक निर्णय, प्रशासकीय सुधारणा आणि विविध लोकोपयोगी व कल्याणकारी योजना यांची क्षेत्रीय स्तरावर प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याची जबाबदारी पालक सचिवांकडे असते. या पालक सचिवांना संबंधित जिल्ह्यात ३ महिन्यातून एकदा किंवा वर्षातून ४ वेळा जिल्ह्यात दौरा करावा लागतो. शासनाच्या कल्याणकारी योजनांचा आढावा घेणे, त्याचा अहवाल सादर करणे, येत असलेल्या अडचणींवर उपाय सुचवायचे असतात. यापूर्वी एकनाथ शिंदे यांच्या सरकारने महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांसाठी पालक सचिवांची नियुक्ती केली होती. मात्र प्रशासकीय कारणास्तव यात काही अंशी बदल करण्यात आला. यातच तुकाराम मुंढे यांच्याकडे परभणीची जबाबदारी देण्यात आली आहे.

## सख्या चुलत्याची

# हत्या करणाऱ्या पुतण्यास जन्मठेप

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील जिल्हा व सत्र न्यायालयाने एका कौटुंबिक वादातून झालेल्या भीषण हत्याकांडाचा निकाल देताना आरोपी पुतण्यास सश्रम जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. घाटनांदूर येथे राहणाऱ्या अर्जुन दत्तात्रय धोंगडे याने आपल्या सख्या चुलत्याकडे खर्चासाठी पैशांची मागणी केली होती. मात्र, चुलत्याने पैसे देण्यास नकार दिल्याने मनामध्ये राग धरून आरोपीने भररस्त्यात कत्तीने सपासप वार करून चुलत्याची निर्घृण हत्या केली होती. याप्रकरणी जिल्हा व सत्र न्यायाधीश अजितकुमार भस्मे यांनी आरोपीला जन्मठेप आणि पाच हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली आहे. ही घटना २०२१ मध्ये घडली होती. मृत जनार्दन धोंगडे हे आपल्या कामावरून घरी परतत असताना आरोपी अर्जुनने त्यांच्यावर हल्ला चढवला. गंभीर जखमी अवस्थेत त्यांना स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. मयताची मुलगी वैशाली वाघमारे यांच्या फिर्यादीवरून अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास ▶▶पान २ वर

# रात्रीतून उभारला शिवरायांचा पुतळा

**गेवराई । प्रतिनिधी**

शहरात रात्रीतून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याची स्थापना करण्यात आल्याची घटना समोर आली असून शहरातील नागरिकांमध्ये आनंद आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गेवराई शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात या ठिकाणी शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारूढ पुतळा उभारण्यात आला. रात्री उशिरा पुतळ्याची स्थापना पूर्ण करण्यात आली असून. सकाळी ही बाब समोर येताच नागरिकांनी मोठ्या संख्येने घटनास्थळी गर्दी केली आणि महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. नागरिकांनी सांगितले की, ▶▶पान २ वर

### गेवराई शहरातील नागरिकांमध्ये आनंद आणि उत्साह



## दारूसाठी पैसे न दिल्याने

# एकाचे डोके फोडले



**बीड । प्रतिनिधी**

दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याचा राग मनात धरून एकाला लाकडी काठ्याने मारहाण करत डोके फोडल्याची घटना ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत खामगाव चौक येथे घडली. या प्रकरणी ग्रामीण - पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. फिर्यादी गिता शिवाजी माळी (रा.सौंदाना) यांच्या पतीला व भाच्याला आरोपी ▶▶पान २ वर

# आवेज परवेज शेख मृत्यू प्रकरणात गुन्हे दाखल करा!

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आक्रोश आंदोलन

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील रस्त्यांच्या मध्यभागी उभे असलेले महावितरणचे विद्युत खांब व उघड्यावरील रोहित्रांमुळे नागरिकांचा जीव धोक्यात आला असून त्यांना सुरक्षित स्थळी हलविण्यात यावे, तसेच महावितरण व हायटेक कंपनीच्या हलगर्जीपणामुळे गोरे वस्ती येथील १५ वर्षीय आवेज परवेज शेख याचा विजेचा धक्का लागून झालेल्या मृत्यू प्रकरणी दोषींवर गुन्हे दाखल करावेत, या प्रमुख मागण्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आक्रोश आंदोलन करण्यात आले. या वेळी



आंदोलनकर्त्यांवरील गुन्हे मागे घ्या!, लोकशाही वाचवा! अशा जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षक, बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व पालकमंत्री ▶▶पान २ वर

# अवकाळी पाऊस,गारपिटीने परळी मतदारसंघात पिकांचे नुकसान

**परळी । प्रतिनिधी**

कालपासून वातावरणात अचानक झालेल्या बदलानंतर परळी मतदारसंघातील अंबाजोगाई तालुक्यासह परळी तालुक्यातील बऱ्याच गावांमध्ये अवकाळी पाऊस, वादळासह गारपीट झाल्याने उभ्या शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शासनास अहवाल सादर करण्याच्या सूचना परळी मतदारसंघाचे आमदार माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना दूरध्वनी द्वारे केले आहेत. रविवारी रात्रीपासून परळी मतदारसंघातील अंबाजोगाई व परळी तालुक्यातील बऱ्याच गावांमध्ये वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस व बऱ्याच गावांमध्ये गारपीट झाली असून, त्यामुळे गहू, ज्वारी, हरभरा, भाजीपाला, फळपिके यांसह विविध पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे ▶▶पान २ वर

### आ.धनंजय मुंडेंच्या जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना



## संपादकीय

# चहापानावर बहिष्कार

सालाबादप्रमाणे यंदाही विरोधी पक्षाने महाराष्ट्र विधानसभा अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला सरकारच्या चहापानावर बहिष्कार टाकला. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला राज्याचे राजकीय वातावरण कमालीचे तापले. महाविकास आघाडीने सरकारच्या चहापानावर बहिष्कार टाकत सत्ताधारी महायुती सरकारवर गंभीर आरोपांची सरबत्ती केली. बहुमताच्या जोरावर सरकारमध्ये एक प्रकारचा माज आला असून महाराष्ट्राची वाटचाल ‘उडता पंजाब’च्या दिशेने सुरू आहे, अशा शब्दांत विरोधी पक्षांनी सरकारला धारेवर धरले. राज्याच्या इतिहासात पहिल्यांदाच विधानसभा आणि विधान परिषद या दोन्ही सभागृहांचे विरोधी पक्षनेतेपद रिक्त असताना हे अधिवेशन पार पडणार आहे. महायुती सरकारमधील मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या कार्यालयातील अधिका–यांना लाच घेताना अँटी करप्शन ब्युरोने रंगेहाथ पकडल्यानंतर राज्याच्या राजकारणात खळबळ उडाली मात्र या प्रकरणातील केवळ संबंधित पीए आणि कनिष्ठ अधिका–यांवर कारवाई करून मंत्र्यांना पाठीशी घालण्याचा प्रकार सुरू आहे. सध्याच्या महायुती सरकारमधील अनेक मंत्री भ्रष्टाचाराच्या दलदलीत अडकले आहेत. मंत्री संजय सिरसाट, योगेश कदम यांच्या विरोधात पुरावे देऊनदेखील सरकार या भ्रष्ट मंत्र्यांना पाठीशी घालत आहे, असा आरोप करत शिवसेना (उबाठा) पक्षाचे नेते भास्कर जाधव यांनी सत्ताधा–यांवर जोरदार हल्लाबोल केला. सत्ताधारी पक्षाचे वर्तन लोकशाहीला साजेशे राहिलेले नाही. जिथे विरोधी पक्षाचा मान–सन्मान राखला जात नाही, जिथे संविधानाचा आदर नाही, अशा सरकारच्या चहापानाला जाण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असे म्हणत अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला सरकारने आयोजित केलेल्या चहापानावर विरोधी पक्ष बहिष्कार घालत असल्याचे त्यांनी जाहीर केले. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला महाविकास आघाडीची संयुक्त बैठक शिवालय येथे पार पडली. या बैठकीनंतर आयोजित संयुक्त पत्रकार परिषदेत भास्कर जाधव म्हणाले, सत्ताधारी आणि विरोधी पक्ष हे लोकशाहीचे अंग आहे मात्र प्रचंड बहुमत मिळाल्यामुळे सरकार मस्तीत आहे त्यामुळे ते विरोधकांचा सन्मान राखत नाहीत. सत्ताधा–यांचे वर्तन लोकशाहीला, संविधानाला धरून नाही म्हणून आम्ही या चहापानावर बहिष्कार टाकत आहोत. जिथे मान–सन्मान नाही तिथे आम्ही जाणार नाही. या पत्रकार परिषदेला राष्ट्रवादी काँग्रेस (श. प.) पक्षाचा एकही नेता उपस्थित नसल्याने राजकीय वर्तुळात अनेक तर्कवितर्क लढवले जात आहेत. शिवसेना नेते भास्कर जाधव यांनी राज्याच्या कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. राज्यात ड्रग्जचा वापर इतका वाढला आहे की, महाराष्ट्र आता ‘उडता पंजाब’ होतोय की काय अशी भीती वाटत आहे. अजित पवार यांच्या अपघाताबाबत सरकारने ठेवलेली संदिग्धता आणि अदानींच्या डिजिटल मीटरबाबत मुख्यमंत्र्यांनी घेतलेली भूमिका यावरही त्यांनी कडाडून टीका केली. जनतेवर सक्तीने मीटर लादणे आणि वरून ‘एक नंबरचे राज्य’ म्हणून छाती बडवणे हे ढोंग आहे, असा टोला जाधव यांनी लगावला. शेतकरी प्रश्न आणि महिला कल्याण योजनांवरूनही विरोधकांनी सरकारला घेरण्याची तयारी दर्शवली आहे. राज्यात शेतकरी आत्महत्यांच्या घटना वाढत असताना कर्जमाफीबाबत ठोस निर्णय घेतला जात नसल्याची टीका करण्यात आली. ‘लाडकी बहीण’ योजनेचे हप्ते मागील २ महिन्यांपासून न मिळाल्याने महिला लाभार्थ्यांमध्ये असंतोष असल्याचा मुद्दा विरोधकांनी उपस्थित केला. महाविकास आघाडीच्या बैठकीत अधिवेशनातील रणनिती ठरवण्यात आली. विविध विषयांवर सरकारला कोंडीत पकडण्यासाठी समन्वय साधण्याचा निर्णय घेण्यात आला. विरोधकांचा आरोप आहे की, सत्ताधारी पक्ष चर्चेला टाळाटाळ करत असून विधिमंडळाच्या परंपरांचा आदर राखला जात नाही. चहापानावर बहिष्कार हा औपचारिक कार्यक्रमाचा भाग असला तरी त्या मागे असलेली राजकीय भूमिका अधिक महत्त्वाची आहे. विधिमंडळातील संवादाचा पूल तुटत चालल्याचे संकेत यातून मिळत आहेत. आगामी अर्थसंकल्पात महसूल तूट, विकास प्रकल्प, सामाजिक योजना आणि शेतकरी कल्याण या विषयांवर तीव्र चर्चा अपेक्षित आहे. अशा परिस्थितीत सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये तणाव वाढल्यास कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. हा बहिष्कार म्हणजे सरकारवर दबाव आणण्याचा प्रयत्न असला तरी त्यातून अधिवेशनातील संघर्ष अधिक तीव्र होणार आहे. लोकशाही प्रक्रियेत संवाद महत्त्वाचा असतो मात्र सध्या आरोप–प्रत्यारोपांच्या राजकारणात संवादाचा सूर हरवत चालल्याचे चित्र दिसत आहे. आगामी काही दिवसांत अधिवेशनात कोणते मुद्दे गाजतात आणि सरकार त्याला कशा प्रकारे उत्तरे देते, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा मृत्यू हा घातपात की अपघात, याबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. राज्यात शेतक–यांच्या आत्महत्या वाढत आहेत. मंत्रालयात थेट ‘लक्ष्मी दर्शन’ सुरू असून ‘एसीबी’ने धाड टाकून संबंधितांना अटक केली आहे. मुख्यमंत्री स्वत:ला ‘इन्फ्रामॅन’ म्हणून स्वत:चे मार्केटिंग करत आहेत. मुलुंडमध्ये मेट्रोचा स्लॅब कोसळून एकाचा मृत्यू झाला. अशा विविध मुद्यांचा उल्लेख करत महाविकास आघाडीने सरकारच्या चहापानावर बहिष्कार टाकला. महायुतीचे बहुमताचे सरकार असूनही त्यांना विरोधी पक्षाची भीती का वाटते? असा सवाल शिवसेनेचे आदित्य ठाकरे यांनी केला. महाराष्ट्रातील एकतरी जिल्हा दाखवा जो ‘सुजलाम् सुफलाम्’ झाला आहे, असे आव्हानही त्यांनी दिले. भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापारी कराराचा फटका राज्यातील कापूस उत्पादक शेतकरी आणि मच्छिमारांना बसणार आहे; परंतु राज्य सरकारने त्याबाबत कसलीही खंत व्यक्त केलेली नाही. दावोस येथे झालेल्या सामंजस्य करारावर श्वेतपत्रिका काढण्याची मागणीही आघाडीने केली आहे.

## तासिका तत्त्वावर कार्यरत अध्यापकांच्या कायमस्वरूपी नियुक्तीच्या याचिकेची सर्वोच्च न्यायालयाने घेतली दखल!

# तासिका तत्ववार काम करणाऱ्या शिक्षकांना कायम करून घ्यावे लागणार-सर्वोच्च न्यायालय

**मुंबई । वृत्तसेवा**

महाराष्ट्रातील सुमारे ४२ शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयांमध्ये तीन ते दहा वर्षांपासून तासिका तत्त्वावर कार्यरत असणाऱ्या मात्र पूर्णवेळ आणि नियमित अध्यापकांच्या जबाबदाऱ्या पार पाडणाऱ्या अध्यापकांच्या याचिकेवर सुनावणी करतेवेळी सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला फटकारले. राज्यातील तासिका तत्त्वावर नियुक्त अध्यापकांना नियमित करण्याची याचिका उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने नोव्हेंबर महिन्यामध्ये फेटाळली होती. त्याविरुद्ध संबंधित याचिकाकर्त्यांनी सर्वोच्च न्यायालयामध्ये धाव घेतली होती. महाराष्ट्रामध्ये शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयांमध्ये तासिका तत्त्वावर नियुक्तीवेळी संबंधित उमेदवारांना पूर्णवेळ सदर महाविद्यालयांमध्ये हजर राहण्याची अट घातली जाते. तसेच, सदर अध्यापकांवर पूर्णवेळ, कायमस्वरूपी व नियमित प्राध्यापकांकडून केल्या जाणाऱ्या कामाची जबाबदारी देण्यात टाकण्यात येते, ही बाब याचिका कर त्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. तासिका तत्त्वावर कार्यरत





असले तरी या अटी व जबाबदाऱ्यांमुळे हे अध्यापक इतर ठिकाणीही काम करू शकत नाहीत. त्यामुळे त्यांच्या रोजगार मिळवून पैसे कमवण्याच्या मूलभूत हक्काची पायमल्ली होते. तासिका तत्त्वावर नियुक्त अध्यापकांना या बदल्यात ताशी नाममात्र ४०० ते ८०० रुपये मानधन देण्यात येत आहे. याउलट नियमित प्राध्यापकांना समान कामाच्या मोबदल्यात दोन लाखांहून अधिक मासिक वेतन व इतर भत्ते आणि लाभ देण्यात येत आहेत. तासिका तत्त्वावर नियुक्त अध्यापकांच्या नियुक्तीपत्रातील पूर्णवेळ उपस्थितीच्या अटींवर बोट ठेवून सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला जाब विचारला. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाने तीन ते दहा वर्ष किंवा त्याहून अधिक काळ तासिका तत्त्वावर पूर्णवेळ नियुक्त अध्यापकांना न्याय मिळण्याच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. आसाम राज्यातील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयांमधील अर्धवेळ कार्यरत अध्यापकांच्या नियमितीकरणाची याचिका सर्वोच्च न्यायालयामध्ये सध्या प्रलंबित आहे. सदर याचिकेचा दाखला देत याचिकाकर्त्यांतर्फे ज्येष्ठ वकील निखिल गोयल, ॲड. नितीन लोणकर, ॲड. सोनाली सूर्यवंशी व ॲड. प्रज्ञा भेके यांनी युक्तिवाद केला.

मानधन: तासिका तत्त्वावरील अध्यापकांना त्यांनी दिवसभरात केलेल्या प्रत्यक्ष अध्यापनाच्या तासांनुसार मेहनताना मिळतो। काही संस्थांमध्ये ५० मिनिटांची एक तासिका गृहीत धरली जाते। मानधनवाढ: कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील तासिका तत्वावरील प्राध्यापकांच्या मानधनात वेळोवेळी वाढ करण्यात आली आहे. पदवी व पदव्युत्तर स्तरासाठी हे मानधन वाढवून (उदा. ९०० रुपये प्रति तास) देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. अटी व नियुक्ती: या नियुक्ती तापुरत्या स्वरूपाच्या असतात. त्यांना परीक्षेचे पर्यवेक्षण किंवा मूल्यमापन कामे दिली जाऊ शकतात, परंतु अनेकदा नियमित अध्यापकांची कामेही त्यांच्याकडून करून घेतली जातात. समस्या: तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांना मिळणारा पगार खूप कमी असतो आणि बऱ्याचदा तो वेळेवर मिळत नाही. तसेच सुट्ट्यांचे पैसे मिळत नाहीत. नवे बदल (२०२५–२६): तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांच्या वेळेवर मानधनासाठी स्वतंत्र पोर्टल विकसित करण्याचे काम सुरू आहे ७। तसेच त्यांच्या कामाचा अनुभव आता ग्राह्य धरला जाणार आहे, ज्यामुळे त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे तासिका तत्वावरील शिक्षकांच्या प्रमुख मागण्या: ✻मानधन वेळेवर मिळावे. ✻दरमहा मानधन वाढवावे. ✻ सेवेत कायम करावे किंवा नोकरीची शाश्वती असावी. ✻समसमान कामासाठी समान वेतन मिळावे.

# ११ केव्ही वस्तीतील विद्युत पोलमध्ये करंट उतरला; शेळीचा मृत्यू

**परळी । प्रतिनिधी**

परळी शहरातील मिलिंद नगर परिसरात महावितरण (एमएसईबी) च्या गंभीर हलगर्जीपणामुळे मोठी जीवितहानी होण्याची शक्यता निर्माण झाली होती. ११ केव्ही वस्तीतील मुख्य रस्त्यालगत असलेल्या विद्युत पोलमध्ये वीजप्रवाह उतरल्याने एका निरपराध शेळीचा दुर्दैवी मृत्यू झाला. सुदैवाने मानवी जीवितहानी टळली असली तरी या घटनेमुळे परिसरात संताप आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तक्षशील सावंत यांच्या घरासमोरील विद्युत खांबामधून करंट उतरला होता. या खांबाच्या संपर्कात आल्याने बायनाबाई कांबळे यांची शेळी जागीच ठार झाली. गोरगरीब कुटुंबासाठी शेळी हा उदरनिर्वाहाचा महत्त्वाचा आधार असल्याने त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. मिलिंद नगर येथील हा मुख्य रस्ता असल्याने येथे दिवसभर नागरिकांची वर्दळ असते. शाळकरी मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक यांची ये–जा सुरू असताना अशी जीवघेणी परिस्थिती निर्माण होणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. गणिमत मानवी हानी झाली नाही; पण प्राण्याचा जीव गेला, त्याची जबाबदारी कोण घेणार? असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. महावितरणच्या

### एमएसईबीच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे मोठी दुर्घटना!

निष्काळजीपणामुळे एखादा निरपराध नागरिक बळी गेला असता तर त्याची जबाबदारी कोणावर टाकली असती, असा प्रश्नही उपस्थित होत आहे. या घटनेची तात्काळ चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी व बायनाबाई कांबळे यांना त्वरित आर्थिक भरपाई द्यावी, अशी जोरदार मागणी होत आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा स्थानिकांनी दिला आहे. महावितरणने आता तरी जागे होऊन अशा धोकादायक विद्युत खांबांची तपासणी करून नागरिकांच्या सुरक्षेची हमी द्यावी, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा आहे. ही घटना प्रशासनासाठी धोक्याची घंटा ठरली असून, वेळेत उपाययोजना न केल्यास भविष्यात मोठी दुर्घटना अटळ असल्याची भीती व्यक्त केली जात आहे.



## पान १ वरून

### जि.प.,पं.स...

अशी परवानगी देता येणार नसल्याचं म्हटलं. राज्यातील राहिलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अनिश्चित काळासाठी प्रलंबित राहण्याची शक्यता आहे. प्रलंबित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम आदेशाच्या अधीन ठेवून निवडणुका घेतल्या जाऊ शकतात, अशी भूमिका राज्य सरकारच्या वतीने तुषार मेहता यांनी मांडली होती. मात्र, सुप्रीम कोर्टानं निवडणुका घेण्यास परवानगी दिलेली नाही. बांठिया आयोगाने दिलेल्या ओबीसी आरक्षणाच्या वैधतेवर सर्वोच्च न्यायालय कधीपासून सुनावणी सुरू करणार याकडे लक्ष लागलं आहे. ओबीसींच्या महाराष्ट्रातील राजकीय आरक्षणावर लवकरच अंतिम सुनावणीला सुरुवात होणार असल्याचं सुप्रीम कोर्टानं सांगितलं आहे. अंतिम सुनावणी लवकर घेऊ अशी भूमिका सर्वोच्च न्यायालयानं घेतली आहे. अंतिम सुनावणी पूर्वतयारी पूर्ण करण्याचे सर्व वकिलांना निर्देश सुप्रीम कोर्टानं दिला आहे.

### परभणीच्या पालक...

गडचिरोलीचे पालक सचिव म्हणून यापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अप्पर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर यांची नियुक्ती केली होती. आता राज्याचे मुख्य सचिव राजेश अगरवाल हे गडचिरोलीचे पालक सचिव असतील. मिलिंद म्हैसकर हे वर्ध्याचे पालक सचिव असणार आहेत. आधी महिला व बालविकास विभागाचे सचिव अनुपकुमार यादव हे पालक सचिव होते. इकबाल सिंह चहल हे मुंबई शहरचे पालक सचिव होते. पण ३१ मार्च २०२६ रोजी ते सेवानिवृत्त होत आहेत. त्यांच्या जागी कौशल्य, रोजगार नाविन्यता व उद्योजगता विभागाच्या अ.मु.स. मनिषा वर्मा यांची नियुक्ती झाली. परभणीचे पालक सचिव दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे असतील. आधी जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दिपक कपूर यांच्याकडे ही जबाबदारी होती. वाशिमचे पालक सचिव – मराठी भाषा विभागाचे सचिव किरण कुलकर्णी यांच्याकडे ही नवी जबाबदारी असेन. मृद व जलसंधारण विभागाचे सचिव गणेश पाटील हे व होते. आता दिली आहे. रत्नागिरीचे पालक सचिव – इतर मागास व बहुजन कल्याण विभागाचे सचिव आप्पासो धुळाज यांची नियुक्ती. आधी सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व विशेष चौकशी अधिकारी (१) श्रीम. सीमा व्यास यांच्याकडे ही जबाबदारी होती.

### हत्या करणाऱ्या...

सहाय्यक पोलीस निरीक्षक एस. व्ही. सावंत यांनी करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. खटल्याच्या सुनावणी दरम्यान सरकार पक्षाच्या वतीने एकूण ७ साक्षीदार तपासण्यात आले. यामध्ये फिर्यादी वैशाली आणि प्रत्यक्षदर्शी हनुमंत धोंगडे यांची साक्ष अत्यंत महत्त्वाची ठरली. बचाव पक्षाने आरोपी मानसिक रुग्ण असल्याचे सांगत बचावाचा प्रयत्न केला, परंतु सरकारी वकील ॲड. लक्ष्मण फड यांनी तीन डॉक्टरांची साक्ष नोंदवून आरोपीचे कृत्य वेडाच्या भरात झालेले नसून तो मानसिकदृष्ट्या सक्षम असल्याचे सिद्ध केले. न्यायालयाने सरकार पक्षाचा युक्तिवाद ग्राह्य धरून ही कठोर शिक्षा सुनावली. या प्रकरणात सरकारी वकील ॲड. लक्ष्मण फड यांना ॲड. सचिन कुलकर्णी आणि पैरवी अधिकारी भाग्यश्री उडाणशीव यांनी सहकार्य केले.

### रामपुरीत ज्वारीचे...

घाव घातल्याने रामपुरीतील शेतकरी दुहेरी संकटात सापडले आहेत. जिल्हाधिकारी व संबंधित प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून नुकसानभरपाई जाहीर करावी, तसेच मागील पुरग्रस्त शेतकऱ्यांनाही त्वरित मदत द्यावी, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांतून होत आहे. नैसर्गिक आपत्तींच्या मालिकेमुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या कोलमडत चालले असून शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.

## पान १ वरून

### अवकाळी पाऊस...

संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना राज्य शासनाकडून आर्थिक मदत मिळावी, यासाठी धनंजय मुंडे यांनी तत्काळ पंचनामे करून नुकसानीचे अहवाल शासनास पाठवण्याचा सूचना जिल्हा प्रशासनाला केल्या आहेत. या पूर्वी देखील खरीप हंगामात विशेष करून हंगामाच्या शेवटच्या टप्प्यात परळी मतदारसंघात अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे प्रचंड मोठे नुकसान झाले होते. धनंजय मुंडे यांच्या पुढाकारातून पंचनामे व अन्य व्यवस्थापनाच्या माध्यमातून मिळालेल्या आर्थिक मदतीमुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात दिलासा मिळाला होता. त्याच पार्श्वभूमीवर गारपीट व वादळी वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानीची देखील भरपाई शेतकऱ्यांना मिळावी, यासाठी धनंजय मुंडे यांनी पुढाकार घेतला आहे.

### आवेज परवेज...

यांना निवेदन देण्यात आले. यावेळी आंदोलनात शेख युनुस,मुबीन शेख, माजी सैनिक अशोक येडे (जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी), रामधन जमाले (जिल्हाध्यक्ष इंटक), शिवशक्ती भिमशक्ति विचारमंच प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील, राजेंद्र आमटे, शेतकरीपुत्र हक्क आंदोलक,किष्किंधा पांचाळ (अध्यक्ष विश्वकल्याण महिला सेवा भावी संस्था बीड) शेख तालेब (पत्रकार सिटीझन), नितिन जायभाये (अध्यक्ष बीड शहर बचाव विचारमंच) , प्रा . राजकुमार कदम,प्राचार्य डी.जी.तांदळे ( जिल्हाध्यक्ष महाराष्ट्र राज्य किसान सभा बीड) डॉ.संजय तांदळे ( अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते संघटना बीड), बाजीराव ढाकणे, शेख बशीर (राज्याध्यक्ष म.र.जि.प.सेवा निवृत्त कर्मचारी संघटना), शेख वाजेद,शेख इमरान,शेख रिजवान,शेख सरफराज,शेख आमेर,शेख रीयाज, सय्यद नवाब,शेख तौफीक, विठ्ठल सवासे आदी सहभागी होते. ✻ आवेज परवेज शेख मृत्यू प्रकरणी गुन्हे दाखल करा : गोरे वस्ती, बीड येथील १५ वर्षीय आवेज परवेज शेख या निष्पाप मुलाचा विजेचा शॉक लागून दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेनंतर संतप्त नातेवाईक व नागरिकांनी न्याय मागणीसाठी रास्तारोको आंदोलन केले. मात्र, संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याऐवजी आंदोलनकर्त्यांवरच गुन्हे दाखल करण्यात आले. आंदोलनकर्त्यांवरील गुन्हे तात्काळ मागे घेऊन महावितरण व हायटेक कंपनीच्या जबाबदार अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी ठाम मागणी करण्यात आली. ✻ शहरातील विजेचे खांब व रोहित्र सुरक्षित करा : बीड शहरातील रस्त्यांच्या मधोमध असलेले १५७ विजेचे खांब व १७ रोहित्र तातडीने सुरक्षित स्थळी हलविण्यात यावेत. जमिनी लगत उघडे असलेले रोहित्र किमान १० फूट उंचीवर संरक्षित करावेत. यासाठी जिल्हा नियोजन निधीतून ३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

### रात्रीतून उभारला...

शिवाजी महाराजांचा पुतळा हा शहराच्या इतिहास आणि संस्कृतीचे प्रतीक असून यामुळे तरुण पिढीला प्रेरणा मिळेल. अनेकांनी फटाके फोडून करून आनंद व्यक्त केला. शहराच्या सौंदर्यात भर पडल्याचे मत व्यक्त केले.

### एकाचे डोके...

प्रल्हाद केशव भावले व आप्पासाहेब कोंडीबा बुधनर (दोघे रा. खामगाव) यांनी दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याचा राग मनात धरत खामगाव चौकात लाकडी काठीने मारहाण करत गंभीर जखमी केले आहे. या प्रकरणी गिता माळी यांच्या फिर्यादीवरून आरोपी प्रल्हाद भावले, आप्पासाहेब बुधनर यांच्या विरोधात कलम ११८ (१), ११५(२), ३५,२,३ (५) बीएनएस प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास पो.ह. जाधव करीत आहेत.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# खानापुरचे सरपंच पंडित आबुज, उपसरपंच सोजरबाई क्षीरसागर अपात्र घोषित

## – जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचा निर्णय : – माजी सभापती कल्याण आबुज यांना दणका

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील खानापूर येथील विद्यमान सरपंच पंडित बाजीराव आबुज आणि विद्यमान उपसरपंच सोजरबाई एकनाथ क्षीसागर यांना पदावरून अपात्र घोषित करण्यात आलंय. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी १८ फेब्रुवारी रोजी हा निकाल दिलाय. नोव्हेंबर २०२३ मध्ये झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत ते निवडून आले होते. या दोघांनीही ग्रामपंचायतीच्या जागेवर अतिक्रमण केल्याचं सुनावणीत सिध्द झालं. त्यामुळे जिल्हाधिकार्यांनी त्यांना पदावरून हटवलं आहे. विकास खंडू कांबळे यांनी १८ जानेवारी २०२४ रोजी सरपंच पंडित बाजीराव आबुज आणि सोजरबाई एकनाथ क्षीरसागर यांना मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १६ (२) प्रमाणे व मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १४ (१) उपकलम (छ) अन्वये सरपंच/उपसरपंच पद रद्द करावे याबाबत बीडच्या जिल्हाधिकार्यांकडे अपिल दाखल केले होते. प्रकरणात कांबळे यांच्यावतीने ॲड. व्ही.सी. मिसाळ यांनी बाजू मांडली. प्रकरणात एकूण १८ तारखा पडल्या होत्या. ११ डिसेंबर २०२५ प्रकरणात अंतिम सुनावणी झाली. आणि जिल्हाधिकार्यांनी आपला निर्णय राखून ठेवला. शेवटी १८ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रकरणात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी निर्णय देत सरपंच पंडित आबूज आणि उपसरपंच सोजरबाई क्षीरसागर यांना अपात्र घोषित करण्यात आले.

### जिल्हाधिकार्यांनी काय निष्कर्ष नोंदवले ?

– सरपंच पंडित आबुज यांना पुनर्वसन विभागाकडून प्लॉट क्रं. २२ ज्याचं क्षेत्रफळ ६००० चौरस फूट मिळाला होता. तथापि ग्रामपंचायत अभिलेखा (नमूना नं. ८) मधील मालमत्ता क्रा. १७४ संदर्भात नोंदीत व्हाईटनर लावून फेरफार केल्याचं गटविकास अधिकारी माजलगाव यांच्या चौकशीत अहवालात स्पष्ट झालं. – पंडित आबुज यांचे पूत्र दिगंबर आबूज यांच्या नावे असलेली मालमत्ता क्र. २०८ ही ग्रामपंचायतीच्या उद्यानासाठी राखीव जागा असल्याचे आणि ती विक्री करण्यात आल्याचे गटविकास अधिकार्याच्या चौकशीत सिध्द झाले. ही बाब गंभीर असल्याचे त्यात म्हटले. – उपसरपंच सोजरबाई क्षीरसागर यांचे पूत्र छगन एकनाथ क्षीरसागर यांनी खानापूर ग्रामपंचायतीच्या उद्यानासाठी राखीव असलेल्या जागी ९०० चौरस फुटावर आरसीसी बांधकाम केल्याची बाब देखील गटविकास अधिकार्याच्या चौकशीतून पुढे आली. – पंडित आबुज आणि सोजरबाई क्षीरसागर यांनी ग्रामपंचायतीच्या उद्यानाच्या आरक्षीत जागेवर अतिक्रमण करणे, अभिलेखातील फेरफार व नोंदणीकृत अतिक्रमण नोंदी, स्वतःच्या व नातेवाईकांच्या नावे ग्रामपंचायतीच्या जागेवर अतिक्रमण करणे या सर्व बाबी ठोस पुराव्यासहीत सिध्द झाल्याचे म्हटले आहे.

**गेल्या अनेक वर्षांपासून पंडित आबुज आणि सोजरबाई क्षीरसागर यांनी पदाचा दुरूपयोग करीत उद्यानासाठीची राखीव जागा, व ग्रामपंचायतीचे इतर भुखंड आपल्या रक्ताच्या नातेवाईकांना वाटप केले आहेत. हे सगळं अनेक वर्षांपासून रेकॉर्डवर आहे. नियमबाह्यपणे, बोगस नावे मतदान यादीत लावून त्यांच्या जोरावर वर्षानूवर्षे निवडून येण्याची किमया साधली जायची. पण प्रत्येकवेळी आम्ही दुर्लक्ष करीत गेलो. पण आता एकही बाब नियमबाह्य खपवून घेतली जाणार नाही. ७० टक्के लोकांनी शासकीय जमीनीवर अतिक्रमण करून या जागेवर पक्की बांधकामे केली आहेत. इथून पुढे अतिक्रमण धारकांनी निवडणूकीत उभे राहू नये, असा या निकालाचा अर्थ आहे. – विकास खंडू कांबळे , ग्रामस्थ, खानापूर**

### जिल्हाधिकार्यांनी निकालात काय म्हटले ?

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी निकाल देताना स्पष्टपणे म्हटले की, विकास खंडू कांबळे यांनी केलेलं अपिल मंजूर करण्यात येत आहे. सरपंच पंडित आबुज आणि उपसरपंच सोजरबाई एकनाथ क्षीरसागर यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १४ (ज–३) मधील तरतुदींचे उल्लंघन केल्याचे प्रथमदर्शनी सिध्द झाले. त्यामुळे त्यांना विद्यमान पदावरून अपात्र ठरविण्यात येत आहे.

### निकाल न देण्यासाठी होता दबाव

**२०२३ मध्ये झालेल्या निवडणुकीत मंगल बालासाहेब मारगुडे विरूध्द पंडित साहेबराव आबुज अशी सरपंचदासाठी जनतेतून लढत झाली होती. पंडित आबुज हे जिल्हा परिषदेचे माजी समाजकल्याण सभापती कल्याण आबुज यांचे चुलते आहेत. त्यांच्यासाठी माजलगावचे आमदार प्रकाशदादा सोळंके यांनी मारगुडे यांच्या विरोधात आपली ताकद पणाला लावली होती. साम, दाम, दंड अशा सगळ्या नितीचा या निवडणुकीत वापर झाला होता. त्यानंतर मारगुडे यांच्या पॅनलकडून विकास खंडू कांबळे यांनी जिल्हाधिकार्यांकडे अपिल दाखल केले. या अपिलावर निर्णय होऊ नये, यासाठी आ.सोळंके यांनी तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्यावर दबाव आणला होता. त्यामुळे त्यांच्या काळात सुनावणी संथ गतीने चालली. नंतर विधानसभा निवडणुकीत कल्याण आबुज यांनी आ.सोळंकेंची साथ सोडली. पण निवडणुका होताच सरपंच पद वाचविण्यासाठी त्यांनी पुन्हा आ.सोळंकेंकडे धाव घेतली. आ. सोळंके यांनी विद्यमान जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यावर सुनावणी न घेण्यासाठी दबाव आणला होता. परंतु जॉन्सन यांनी दबावाला न जुमानता मेरिटवर निर्णय दिला**



*हुसैन पठान , अबूबकर पठान या दोन भावांचा पहिला रोज पूर्ण*

# विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती निमित्त प्राथमिक बैठक संपन्न

## माजलगावची जयंती रुबाबदार होणार – विजय साळवे

**माजलगाव । प्रतिनिधी**

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सार्वजनिक जयंतीनिमित्त माजलगाव शहरातील हॉटेल व्यंकटेश येथे प्राथमिक बैठकीचे आयोजन करण्यात आले. शहरातील प्रत्येक नगरातील आंबेडकर प्रेमी नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत जयंती उत्साहात व शिस्तबद्ध पद्धतीने साजरी करण्याचा निर्धार व्यक्त केला. बैठकीत सर्वानुमते महत्त्वाचे ठराव मंजूर करण्यात आले. यंदाची भीम जयंती शहरात व्यसनमुक्त व डिजे–मुक्त पद्धतीने साजरी करण्यात येणार असून प्रत्येक नगरातील जयंती समितीच्या वतीने माता रमाई यांच्या घरासाठी निधी संकलन करण्यात येईल, असा निर्णय घेण्यात आला. तसेच सार्वजनिक जयंतीनिमित्त शहरात विविध सामाजिक उपक्रम राबविण्याचाही ठराव मंजूर करण्यात आला. दि. २२ फेब्रुवारी रोजी झालेल्या या बैठकीस शिव–शाहू–फुले–आंबेडकर विचारधारेचे मान्यवर, नगरसेवक व भीम सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. माजलगाव शहरातील प्रत्येक नगरातून भीम जयंती मोठ्या थाटामाटात पण शिस्तबद्ध व समाजोपयोगी उपक्रमांसह साजरी केली जाईल, असा विश्वास आंबेडकरी चळवळीचे नेते विजय साळवे यांनी व्यक्त केला. यावेळी कचरू खळगे, अविनाश जावळे, नवनाथ धाईजे, उत्तमराव जोगदंड, भिमराव टाकणखार, धम्मानंद साळवे, अंकुश जाधव, राजेश साळवे, विवेक पोटभरे, सदानंद प्रधान, राकेश साळवे, सचिन जावळे, अभिजित पोटभरे, सचिन उजगरे, सिद्धार्थ ससाणे, अविनाश बनसोडे, भास्कर शिंदे, राज अर्जुन, सय्यद राफिक, राजकुमार सोनवणे, ड. अमोल डोंगरे, प्रदीप साळवे, आकाश टाकणखार, केतन प्रधान, राहुल कांबळे, कपिल जावळे, मुन्ना धापसे आदींनी आपले मत मांडले. प्रसंगी गोविंद टाकणखार रुपचंद कांबळे चंद्रकांत टाकणखार अशोक जाधव कपिल वाघमारे चंद्रमणी डोंगरे दिपक कसबे तौफिक सय्यद आकाश सोनवणे अनिल कांबळे रवि सोनवणे सन्नी प्रधान अक्षय साळवे अभिषेक चौरे सिद्धांत सुरवसे विशाल साळवे अकाश घुगे बाळु साळवे विनोद टाकणखार अतुल भदर्गे बाबा दाभाडे यांच्यासह शेकडो भीमसैनिक उपस्थित होते.





*माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयात संत गाडगेबाबा यांची जयंती साजरी करतांना कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सवणे साहेब समवेत,लेखापाल उद्धव फपाळ,संख्याकी आधिकारी मोतीराम चव्हाण,कोषपाल मीनानाथ मुळे, निरीक्षक सुनील सवणे,वरिष्ठ लिपिक अमोल आगे, प्रतवारीकार अतुल होके,नाईक शेख रहीम व सर्व कर्मचारी बांधव*

# कर्जतमध्ये पत्रकारांचा भव्य मेळावा; एप्रिलमध्ये उदगीर येथे राष्ट्रीय अधिवेशन एस. एम. देशमुख

**कर्जत (रायगड)/वडवणी प्रतिनिधी**

पत्रकारांची मातृसंस्था म्हणून ओळख असलेल्या अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदच्या वतीने आयोजित रंगाअण्णा वैद्य आदर्श जिल्हा व वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ पुरस्कार वितरण सोहळा कर्जत येथील रॉयल गार्डनमध्ये उत्साहात पार पडला. राज्यभरातील सातशेहून अधिक पत्रकारांच्या उपस्थितीत झालेल्या या भव्य सोहळ्यात एप्रिल महिन्यात उदगीर तालुक्यात होणाऱ्या राष्ट्रीय अधिवेशनाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना देशमुख म्हणाले की, पत्रकारांना न्याय मिळवून देण्यासाठी परिषद राज्यभर कार्यरत असून वर्षभर विविध उपक्रम राबविले जातात. दर दोन वर्षांनी होणारे राष्ट्रीय अधिवेशन यंदा





उदगीर येथे होत असून ते अधिक प्रभावी करण्यासाठी सर्व पत्रकारांनी एकत्र यावे, असे त्यांनी आवर्जून सांगितले. कर्जत प्रेस क्लबने केलेल्या नियोजनाचे त्यांनी विशेष कौतुक केले. या कार्यक्रमाला मावळचे खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेंद्र थोरवे, माजी आमदार सुरेश लाड, परिषदेचे अध्यक्ष मिलिंद आष्टीवकर, विश्वस्त शरद पाबळे, किरण नाईक, दिपक कैतके, जेष्ठ पत्रकार हेमंत देसाई, मंदार फणसे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, उपाध्यक्ष विशाल परदेशी, डिजिटल मीडियाचे अध्यक्ष अनिल वाघमारे, सरचिटणीस राहुल शिंदे, सहप्रसिद्धी प्रमुख भरत निगडे, मुंबई रायगड प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत गोपाळे, कार्याध्यक्ष संजय मोहिते, कर्जतचे उपनगराध्यक्ष संजय पाटील, माजी अध्यक्ष भारत रंजणकर, कोकण विभागाध्यक्ष अनिल भोळे आदी मान्यवर उपस्थित होते.

ढोल–ताशांच्या गजरात स्वागत – कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या ढोल–ताशांच्या गजरात मिरवणुकीने झाली. सजविलेल्या वाहनातून मान्यवरांचे आगमन झाले. परिषदेच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. प्रवेशद्वारावर कोकणातील पारंपरिक 'बाल्या' नृत्याचे सादरीकरण करण्यात आले. महिलांनी औक्षण करून मान्यवरांचे स्वागत केले.

पत्रकारितेतील निर्भयतेचा आग्रह – जेष्ठ पत्रकार हेमंत देसाई यांनी पत्रकारांनी शोध पत्रकारिता अखंडपणे सुरू ठेवावी, नव्या तंत्रज्ञानाचे ज्ञान आत्मसात करावे, असे सांगितले. परिषदेच्या माध्यमातून पत्रकारांच्या प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा होत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

खासदार श्रीरंग बारणे यांनी जेष्ठ पत्रकारांना रेल्वे प्रवास सवलत मिळावी यासाठी दिल्ली येथे प्रयत्न केल्याचे सांगितले. पत्रकार अत्यंत कष्टाने आणि प्रसंगी जीव धोक्यात घालून कार्य करतात, याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

परिषदेचे अध्यक्ष मिलिंद आष्टीवकर यांनी रायगड जिल्ह्यातील प्रेस क्लबच्या कामाचा गौरव केला. मंदार फणसे यांनी पत्रकारांनीही संघटित होऊन एकत्रितपणे भूमिका मांडावी, असे मत व्यक्त केले. विश्वस्त शरद पाबळे यांनी परिषदेच्या कामाचा आढावा मांडला, तर किरण नाईक यांनी डिजिटल पत्रकारितेच्या वाढत्या प्रभावाचा उल्लेख केला.

पुरस्कार वितरण – यावर्षीचा 'पत्रमहर्षी रंगाअण्णा वैद्य आदर्श जिल्हा पत्रकार संघ' पुरस्कार परभणी जिल्हा पत्रकार संघाला प्रदान करण्यात आला.

# चंद्रभागा पोद्दार लर्न स्कूलला संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान उत्साहात संपन्न



**दिंद्रुड । प्रतिनिधी**

येथील पोद्दार लर्न स्कूल येथे संत गाडगेबाबा जयंतीच्या औचित्याने ग्रामस्वच्छता अभिमान राबवण्यात आले. शाळेसह आवारात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.शिक्षकवृंदासह विद्यार्थी उत्साहात या उपक्रमात सहभागी झाले होते. या प्रसंगी शाळेचे अध्यक्ष अतुलजी ठोंबरे सह मुख्याध्यापक निलेश निंदाने, शाळेचे समन्वयक राजेंद्र पांडे, ज्योती मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन करून उपक्रमाची सुरुवात करण्यात आली.यावेळी विद्यार्थ्यांनी शाळा परिसराची स्वच्छता केली. तसेच विद्यार्थ्यांना संत गाडगेबाबा यांच्या जीवनकार्यावर आधारित माहितीपर चित्रपट दाखविण्यात आला. संत गाडगेबाबा यांचे स्वच्छतेविषयीचे विचार व सामाजिक कार्य विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले.फक्त आपले घर व शाळाच नव्हे तर आपल्या आजूबाजूचा परिसर, पर्यावरण स्वच्छ ठेवणे ही प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी आहे. स्वच्छतेची सवय ही दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनली पाहिजे असे मार्गदर्शन अध्यक्ष अतुल ठोंबरे यांनी उपस्थितांना केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेची जाणीव, पर्यावरणाविषयीची जबाबदारी व सामाजिक बांधिलकी अधिक दृढ होईल अशी अपेक्षा ठोंबरे यांनी यावेळी बोलताना व्यक्त केली.


## जाहीर प्रगटन

### तहसिल कार्यालय बीड (संकीर्ण विभाग)

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार, बीड**
**यांचे न्यायालयात सुनावणी नोटीस**

Email-tahasilbeedgmail.com
दुरध्वनी: ०२४४२-२२२९०२
क्र.२०२६/संकीर्ण/जन्म-मृत्यू नोंद/कावी- २१
दिनांक २३/०२/२०२६

प्रति,
३. मुख्या अधिकारी न.प. बीड
४. ग्रामविकास अधिकारी/ग्रामसेवक
ग्रामपंचायत कार्यालय...... ता बीड

विषय :- मृत्यू नोंद प्रस्ताव संदर्भाने जाहीर नोटीस प्रसिध्द करणेबाबत.

संदर्भ :- १. भारत राजपत्र सी.जी. डी. एल. अ. (१२०८२०२३-२४८०४४ नवी दिल्ली शुक्रवार ऑगष्ट ११,२०२३ श्रावण शके २०.१९.४५ (शक) विधी व न्याय मंत्रालय (कायदा विभाग) यांचेकडील शासन आदेश निर्देश परिपत्रक व व्याप्ती निर्देशान्वये या न्यायालयात प्रकरण चालविण्याचा अधिकार आहे.

२. मा. जिल्हाधिकारी बीड यांचे आदेश क्र २०२३/आरबी-डेस्क-१ /पोल-१/ जन्म-मृत्यू नोंदणी कायदा-२०२३ दिनांक १३.१०.२०२३

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, यासोबत संदर्भीय पत्रकांचे अधिनतेने जन्म-मृत्यू प्रस्ताव क्र मधील जाहीर नोटीस प्रसिध्दीसाठी पाठवित आहोत.

त्याअनुषंगाने प्रकरणातील जाहिर नोटीस आपल्या कार्यालयाचे नोटीस बोर्ड वर प्रसिध्द करुन प्रसिध्दीचा पंचनामा त्वरीत या कार्यालयास सादर करावा.

शिक्का

(स्वाक्षरीत)
तहसिलदार, बीड.

## जाहीर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं. २१/२०२६**
**जयप्रकाश प्रभाकरराव भट –विरुध्द– मुख्याधिकारी, न.प.बीड**

**पहा,**
**१. जयप्रकाश प्रभाकरराव भट, रा. काळे गल्ली, बीड, ता.जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **मयत प्रभाकर दगडूपंत भट यांचा दिनांक १६/०७/२०१६ रोजी मृत्यू** झालेला असुन त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत न.प. बीड ता.बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु कार्यालय/न.प. कार्यालयास

प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे **न.प. बीड ता. जि.बीड** येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २३/२/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. **सदर प्रकरणात पुढील तारीख २३/०३/२०२६ ही आहे.**

शिक्का

(स्वाक्षरीत)
तहसिलदार, बीड.

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

### श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १३८/२०२६**
**भरत पि. मोहन सोसे व इतर वि. निरंक**

ज्याअर्थी **मयत नामे मोहन पि. किसनराव सोसे, रा. वडगांव (ढोक) ता. गेवराई जि. बीड हे / हया दिनांक २२/०५/२०२५ रोजी वडगाव (ढोक) ता. गेवराई येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. १. भरत पि. मोहन सोसे, वय २६ वर्षे, धंदा शेती, रा. वडगांव (ढोक) ता. गेवराई जि.बीड अर्जदार क्र. २. शुभांगी भ्र. अक्षय बटुळे, वय २४ वर्षे, धंदा घरकाम, रा. भारजवाडी ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर, अर्जदार क्र. ३ कौशल्या भ्र. मोहन सोसे, वय ५६ वर्षे, धंदा घरकाम, रा. वडगांव (ढोक) ता. गेवराई जि.बीड अर्जदार क्र. ४ प्रयागाबाई भ्र. किसनराव सोसे, वय ८५ वर्षे, धंदा घरकाम, रा. रा. वडगांव (ढोक ) ता. गेवराई जि.बीड** यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत मोहन पि. किसनराव सोसे यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक २१/०२/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

**पुढील तारीख – ०२/०४/२०२६**
**( मार्फत – ॲड एस. बी. खाडे, गेवराई)**

शिक्का

(स्वाक्षरीत)
क. लिपीक

आदेशावरून
(स्वाक्षरीत)
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर गेवराई

दैनिक **मराठवाडा पत्र**

महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● मंगळवार, दि. २४ फेब्रुवारी २०२६ ●

## थोडक्यात...


### बीड जिल्ह्यातील वाचनालयाच्या तपासण्या बाहेर जिल्ह्याच्या अधिकाऱ्या मार्फत होणार



**बीड । प्रतिनिधी**

रत्नागिरी येथे महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ कोकण विभाग ग्रंथालय संघ व रत्नागिरी जिल्हा ग्रंथालय संघ हीरक महोत्सव वर्षाचे अधिवेशन दि. २१ व २२ फेब्रुवारी २०२६ रोजी संपन्न झाले. या कार्यक्रमात अशोक गाडेकर ग्रंथालय संचालक महाराष्ट्र राज्य यांनी मार्गदर्शन करताना सांगीतले, कार्यरत वाचनालयांना ४० टक्के अनुदान वाढ करण्यात आली असून ते पुढच्या हप्त्याच्या अनुदानात मिळेल असे सांगितले. वाचनालयाचे पदाधिकारी ने लक्ष देऊन वर्तमानपत्र चालू ठेवावे, आमचे बाहेर जिल्ह्यातील अधिकारी केव्हाही येऊन तपासणी करून अहवाल पाठवतील मा. ना. चंद्रकांत दादा पाटील उच्छ व तंत्र शिक्षण मंत्री महाराष्ट्र राज्य यांनी २०००/ दोन हजार वाचनालयांना मान्यता देण्याचे जाहीर केले असून नियमात बसणाऱ्या वाचनालयाचे प्रस्ताव बजेट उपलब्ध झाल्यावरच मागवले जातील, तीन वर्ष तपासण्या होणार नाहीत असे गृहीत धरू नका.., आम्ही सर्व ग्रंथालयाकडे लक्ष ठेवून आहोत प्रत्येक ग्रंथालय ऑफलाईन आहे हे विसरू नका. असे अशोक गाडेकर यांनी आपल्या मार्गदर्शन पर भाषणात सांगीतले आहे. राज्यस्तर अधिवेशन यशस्वी केल्या बद्दल ग्रंथालय संघाचे अध्यक्ष गजानन कोठेवार यांचे त्यांनी कौतुक केले.

### नागरिकांना महत्त्वाचे आवाहन: तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी बीड, चंद्रकांत शेळके यांचे आवाहन



**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यात पुढील काही तासात वीजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता भारतीय भू-विज्ञान मंत्रालयाच्या Damini Lightning -lert प्रणालीद्वारे दर्शविण्यात आली आहे. त्याअनुषंगाने सर्व नागरिकांना पुढील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन करण्यात येत आहे : शक्यतो उघड्या मैदानात, शेतात किंवा टेकड्यांवर थांबणे टाळावे. मोठ्या झाडाखाली, विजेच्या खांबाजवळ किंवा लोखंडी संरचनेजवळ आश्रय घेऊ नये. मोबाईल चार्जिंग, टीव्ही, फ्रिज यांसारखी विद्युत उपकरणे तात्पुरती बंद ठेवावीत. पावसाळी वातावरणात वाहन उघड्या जागेत पार्क करू नये. शेतकरी बांधवांनी तात्काळ सुरक्षित ठिकाणी आसरा घ्यावा व शेतीकाम थांबवावे. लहान मुले व जनावरे यांना घरात सुरक्षित ठेवा. आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सतर्क असून कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास त्वरित स्थानिक प्रशासनाशी संपर्क साधावा.



*माजलगाव : थोर समाज सुधारक संत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करताना महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ड.सुभाष भाऊ राऊत, परीट समाजाचे राज्य उपाध्यक्ष गणेशजी जगताप, समता परिषद शहराध्यक्ष निखील शिंदे, नितीन राऊत, अजिंक्य सुरवसे, महेश वेवहारे, आदींसह समता सैनिक उपस्थित होते.*

# आज शांतीब्रम्ह नवनाथ बाबा यांची बक्करवाडी येथे भव्य मिरोणूक



## दोन धाम पूर्ण ; स्वागतास भाविक भक्तांनी उपस्थित रहावे

**बीड । प्रतिनिधी**

गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज मठाधिपती महंत श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी यांचे आज दि. २४ फेब्रुवारी मंगळवार रोजी सायंकाळी ४:३० वाजता दोन धाम यात्रा पूर्ण करून बक्करवाडी येथे आगमन होणार आहे गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांनी रामटेक नागपूर, मैहर शरद



देवी, प्रयागराज, वाराणशी (काशी) गोरखपुर, पशुपतिनाथ नेपाळ, मनोकामनादेवी नेपाळ, चंद्रगिरी नेपाळ, भोलेश्वार नेपाळ, अयोध्या, चित्रकूट, मंदाकिनी नदी आरती, उज्जैन महाकालेश्वर, काळभैरव, ओंकारेश्वर, मुक्ताई नगर, बीड असा दोनधाम यात्रा प्रवास पूर्ण करून आगमन होणार आहे गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांचे दोनधाम यात्रा पूर्ण करून बक्करवाडी येथे आगमन होणार आहे म्हणून सर्व भाविक भक्ताच्या वतीने गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांची भव्य मिरोणूक आयोजन भाविक भक्ताच्या वतीने बक्करवाडी फाटा ते बक्करवाडी गाव येथे भव्य मिरोणूक आयोजन करण्यात आले आहे तरी सर्व भाविक भक्तांनी बाबाच्या स्वागत मिरवणुकीस उपस्थित रहावे.

# स्वच्छता हीच सेवा हा संत गाडगे महाराजांचा संदेश आजही प्रेरणादायी: डॉ.योगेश क्षीरसागर

## बीडमध्ये राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत गाडगे महाराजांनी कीर्तनांच्या माध्यमातून समाजप्रबोधन केले. 'स्वच्छता हीच सेवा' हा त्यांचा संदेश आजही प्रेरणादायी आहे. गावोगावी स्वच्छतेची व्यापक चळवळ उभी करत त्यांनी समाजपरिवर्तनाची दिशा दिली. दीन-दुबळ्यांची सेवा, शिक्षणाचा प्रसार आणि समाजातील वाईट प्रथांविरोधात त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांचे विचार आजही समाजाला दिशादर्शक ठरत आहेत, असे प्रतिपादन भाजपचे



युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले. बीड शहरात स्वच्छता, समाजसेवा आणि अंधश्रद्धा निर्मूलनाचा संदेश देणाऱ्या राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त सोमवारी (दि. २३) राष्ट्रसंत गाडगे महाराज पुतळा परिसरात त्यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. योगेश क्षीरसागर अतिथी म्हणून बोलत होते. याप्रसंगी नगरसेवक शुभम धुत, मंगेश धोंगडे, राजाभाऊ पिंगळे, अशोक तांबारे, अमोल पौळ, नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्दीकी, विठ्ठल गुजर, शुभम कातांगळे, प्रा. रवी शिंदे, विकास यादव, शारदाताई डुलगज तसेच प्रशांत पवार, मोहन राऊत, विक्रम वाघमारे, रमेश घोडके, सुशांत राऊत यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ.ज्योतीताई मेटे यांच्या उपस्थितीत संत गाडगे बाबा यांची जयंती साजरी



**बीड । प्रतिनिधी**

संत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त अंबिका चौक पोस्टमन कॉलनी येथील परिसर स्वच्छ करून प्रतिवर्षीप्रमाणे जयंती साजरी करण्यात आली . जयंतीनिमित्त उपस्थित शिवसंग्रामच्या अध्यक्षा डॉ. ज्योतीताई मेटे , बीड शहराध्यक्ष सुहास आबा पाटील, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा मनिषाताई कुपकर, , सांस्कृतिक आघाडीचे जिल्हाध्यक्ष अशोक लोकरे महिला , आघाडी बीड शहराध्यक्ष संगीताताई ठोसर , कैलास शेजाळ , हरिश्चंद्र ठोसर तसेच नगरपरिषद स्वच्छता कर्मचारी व कॉलनीमधील नागरिक सावरे साहेब , अशोक कुडके , मानेताई, वाघमारेताई , पवारताई तसेच प्रभागामधील नागरिक , शिवसंग्रामचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# शालेय जीवनातील संस्कार हीच भविष्यातील यशाची खरी शिदोरी: श्री गणेश वाघ

## बीडमधील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालय येथे दहावीच्या विद्यार्थ्यांना भावपूर्ण निरोप

**बीड । प्रतिनिधी**

शालेय जीवनातील मैत्री आणि संस्कार हीच भविष्यातील यशाची खरी शिदोरी असून याच शिदोरीवर विद्यार्थ्यांनी जीवनामध्ये यश संपादन करून आपल्या आई-वडिलांचे आणि शाळेचे नाव उज्वल करावे असे आवाहन शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री गणेश वाघ सर यांनी शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ, छत्रपती शिवाजी महाराज जयंती आणि शिक्षण महर्षी स्व. गोविंदराव वाघ यांच्या जयंतीनिमित्त आयोजित रंगभरण स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना केले.

**शिक्षण महर्षी स्व. गोविंदराव वाघ यांच्या जयंतीनिमित्त आयोजित रंगभरण स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले. ज्ञया स्पर्धेतील प्राथमिक गटातील प्रथम क्रमांक मिळवलेल्या कु. संध्या कवठेकर (रु. १००० व प्रमाणपत्र) आणि द्वितीय क्रमांक मिळालेल्या कु. शुभेच्छा कदम (रु. ५०० व प्रमाणपत्र) देऊन कौतुक करण्यात आले. तर माध्यमिक गटात प्रथम क्रमांक मिळवलेल्या श्रेया कदम ( प्रमाणपत्र आणि रोख रु. १०००), द्वितीय क्रमांक मिळालेल्या आरोही अतुल भडगळे हिस ( प्रमाणपत्र आणि रोख रु. ५००) तर तृतीय क्रमांक मिळवलेल्या कु. अदिती घुमरे ( प्रमाणपत्र आणि रोख रु. ३०० रूपये) असे पारितोषिक देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले.**





# मंजरथ वाळूघाटावर नियमांची पायमल्ली...

# उल्लंघन केल्यास घाट तात्काळ बंद : तहसीलदारांचा कडक इशारा

## सीसीटीव्ही, जीपीएस व ओव्हरलोडिंगमध्ये ढिलाई चालणार नाही ; नियम मोडल्यास थेट कारवाई

**● मौजे मंजरथ येथील नागरिकांनी या प्रकरणी बहुजन विकास मोर्चा चे संस्थापक अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांच्या निवासस्थानी भेट घेऊन आम्हाला न्याय द्या असे म्हणत त्यांची भेट घेतली ग्रामस्थांच्या मागणीची दखल घेऊन बहुजन नेते बाबुराव पोटभरे यांनी येथील सहसीलदार संतोष रुईकर यांची तात्काळ भेट देऊन नियम आणि अटींचे उल्लंघन करणाऱ्या संधीत ठेकेदार याच्यावर कादेशीर कार्यवाई ची मागणी करताच तहसीलदार यांनी संमधीत ठेकेदार याला तात्काळ पत्र काढून तंबी दिली**

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील मौजे मंजरथ येथील वाळूघाटावर शासनाने घालून दिलेल्या अटींचे उल्लंघन होत असल्याच्या तक्रारीनंतर प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. विवेक जॉन्सन, जिल्हाधिकारी बीड यांच्या दि. १४ जानेवारी २०२६ रोजीच्या कार्यारंभ आदेशानुसार सन २०२५-२६ या कालावधीसाठी पर्यावरण मान्यता प्राप्त वाळूघाटांचे ई-निविदा प्रक्रियेद्वारे वाटप करण्यात आले होते. त्यानुसार मंजरथ वाळूघाटाचा ताबा संबंधित ठेकेदारास देण्यात आला आहे. मात्र घाटावर नियमांचे काटेकोर पालन होत नसल्याच्या गंभीर तक्रारी प्रशासनाकडे प्राप्त झाल्यानंतर तहसीलदार, माजलगाव यांनी दि. १५ फेब्रुवारी २०२६ रोजी अचानक भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. प्राप्त तक्रारींमध्ये वाळू उत्खनन स्थळी सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत नसणे, जेसीबी व पोकलेन यंत्रांचा वापर करून उत्खनन करणे, वाहनांमध्ये अधिकृत मजुरांऐवजी थेट वाळू भरणे, क्षमतेपेक्षा जास्त वाळू वाहतूक करणे, जीपीएस प्रणालीचा अभाव तसेच शासनाने निश्चित केलेल्या वेळेपेक्षा जास्त काळ वाहतूक सुरू ठेवणे या गंभीर बाबींचा समावेश होता. पाहणीदरम्यान सीसीटीव्ही यंत्रणेतील त्रुटींबाबत प्रशासनाने तीव्र नाराजी व्यक्त केली. शासनाच्या स्पष्ट



सूचनांनुसार उत्खनन व वाळू भरण्याच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत असणे बंधनकारक आहे. केवळ कॅमेरे बसविणे पुरेसे नसून त्यांचा नियमित डेटा दर सोमवारी संबंधित कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. यापुढे सीसीटीव्ही प्रणालीमध्ये कोणतीही ढिलाई आढळल्यास ती गंभीर नियमभंगाची बाब मानली जाईल, असा इशारा देण्यात आला आहे. वाळू उत्खननासाठी जेसीबी व पोकलेन यांसारख्या यंत्रांचा वापर होत असल्याच्या तक्रारींचीही प्रशासनाने गंभीर दखल घेतली आहे. नियमबाह्य यांत्रिक उत्खनन आढळल्यास संबंधित यंत्रसामग्री तात्काळ जप्त करण्यात येईल आणि जबाबदारांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कोणतीही दया दाखवली जाणार नाही, असा ठाम संदेश तहसीलदारांनी दिला.वाहनांमध्ये वाळू भरताना कामगार आयुक्तांच्या ओळखपत्रधारक मजुरांचाच वापर करणे बंधनकारक असताना काही ठिकाणी थेट वाळू भरण्याचे प्रकार होत असल्याचे समोर आले. ही बाब अत्यंत गंभीर मानून संबंधितांना तातडीने नियमांचे पालन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. अधिकृत ओळखपत्र नसलेल्या मजुरांचा वापर आढळल्यास कारवाई करण्यात येईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले. ओव्हरलोडिंगच्या तक्रारींवरही प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. वाहनांच्या क्षमतेपेक्षा जास्त वाळू आढळल्यास गौण खनिज कायद्यानुसार कठोर दंडात्मक कारवाई करण्यात येईल. ओव्हरलोडिंगमुळे अपघाताचा धोका वाढतो, रस्त्यांची हानी होते व शासन महसुलाचे नुकसान होते, त्यामुळे अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी विशेष तपासणी मोहीम राबविण्याचा इशारा देण्यात आला आहे. वाळू वाहतूक करणाऱ्या सर्व वाहनांना जीपीएस प्रणाली बसविणे अनिवार्य असतानाही काही वाहनांमध्ये जीपीएस नसल्याचे निदर्शनास आले. जीपीएसशिवाय एकही वाहन रस्त्यावर आढळू नये, अन्यथा तात्काळ कारवाई केली जाईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच शासनाने निश्चित केलेल्या वेळेतच वाळू वाहतूक करावी, वेळेच्या बाहेर वाहतूक आढळल्यास ती गंभीर उल्लंघन मानली जाईल.

दरम्यान, भविष्यात कोणतेही उल्लंघन पुन्हा आढळल्यास संबंधित वाळूघाट बंद करण्याबाबत प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय बीड यांच्याकडे पाठविण्यात येईल, असा स्पष्ट इशारा तहसीलदारांनी दिला आहे. मंजरथ वाळूघाटावरील कारभारावर प्रशासनाची कडक नजर असून नियमांचे तंतोतंत पालन न केल्यास कठोर परिणामांना सामोरे जावे लागेल, असा निर्वाणीचा इशारा देण्यात आला आहे.